

**उचगाव : येथील हेल्पर्स ऑफ हॅन्डीकॅप्ड संस्थेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करताना डॉ. अंजली निगवेकर.**

# 'हेल्पर्स'मधील गुणवंतांचा गौरव

उचगाव : येथील हेल्पर्स ऑफ हॅन्डीकॅप्ड संस्थेच्या समर्थ विद्यालयातील दहावी व घरौंदा वसतिगृहातील बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव नुकताच झाला. एकूण एक लाख रुपयांचे विविध पुरस्कार देऊन या विद्यार्थ्यांना गौरवण्यात आले. दरम्यान, यावेळी दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर कक्षाचे उद्‌घाटनही झाले. पत्रकार सुभाष धुमे, निवृत्त बँक अधिकारी श्रीकांत धुमे, शिवाजी विद्यापीठ ललित कला विभागप्रमुख डॉ. अंजली निगवेकर आदींच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम झाला. प्रवाहाबाहेरील मुलांना मुख्य प्रवाहात आणण्याचे महत्त्वपूर्ण काम 'हेल्पर्स'च्या माध्यमातून सुरू असल्याचे गौरवोद्‌गार यावेळी त्यांनी काढले.कार्यक्रमाला अनिल नाईक, सुधांशू नाईक, डॉ. अरुणा भिर्डी, अनंत घोटगाळकर, अविनाश सहस्त्रबुध्दे, मीरा सहस्त्रबुध्दे, संस्थेच्या अध्यक्षा डॉ. नसीमा हुरजूक, उपाध्यक्ष पी. डी. देशपांडे, मनोहर देशभ्रतार, सुचित्रा मोर्डेकर, तेजश्री शिंदे, नंदकुमार मारे आदी यावेळी उपस्थित होते.

# सायबर सिक्युरिटीवर रविवारी कार्यशाळा

कोल्हापूर टाइम्स टीम

शिवाजी विद्यापीठाचे कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र आणि कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने बँक अधिकारी व कर्मचारी वर्गासाठी आंतरराष्ट्रीय ख्यातीचे सायबर कायदेतज्ज्ञ अॅड. प्रशांत माळी यांचे 'सायबर सिक्युरिटी' या विषयावर व्याख्यान होणार आहे. रविवारी (त. १४ ) सकाळी १० ते २ या वेळेत शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र विभागाच्या सभागृहात ही कार्यशाळा होणार आहे.

गेल्या काही दिवसांत सहकारी बँकांवर लागोपाठ सायबर हल्ले झाले आहेत. देश आणि परदेशातून हॅकर्सनी काही मोठ्या बँकांचे सर्व्हर हॅक करून त्यायोगे सहकारी बँकांच्या खात्यांवर निशाणा साधला आहे. हे हल्ले कसे झाले हे अजूनही पूर्णपणे उजेडात आलेले नाही. मात्र सहकारामध्ये लोकांच्या विश्वासास पात्र ठरलेल्या बँकांचे खात्यावरील निधी मोठ्या प्रमाणात गायब झालेले आहेत. हे असेच घडत राहिले तर भविष्यात संगणक माध्यम वापरणे म्हणजे ज्वालामुखी वापरण्यासारखे होईल. त्यामुळे या सायबर गुन्ह्यांची आणि त्याविषयक कायद्यांची सविस्तर माहिती घेणे हे आज अत्यंत गरजेचे आहे. परिसरातील अनेक लोकांच्या बँक खात्यावरील पैसे अचानक इतर व्यक्तीने काढून घेतल्याच्या घटना घडताना दिसतात, या प्रकाराबद्दल बँकही अनभिज्ञ असते, कारण संबंधित खात्यावर सायबर हल्ला झालेला असतो. याबाबतचे ज्ञान बँक कर्मचारी वर्गाला नसल्याने बँक व ग्राहक यांना मोठा तोटा सहन करावा लागतो. अशा सायबर हल्ल्याविषयी बँक कर्मचाऱ्यांना माहिती असणे आवश्यक आहे. या हेतूने या उपक्रमाचे आयोजन केले आहे. या व्याख्यानास कोल्हापूर, सांगली, सातारा, रत्नागिरी आणि सिंधुदूर्ग जिल्ह्यातील बँकांचे संचालक आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

लोकमत

# दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी शिवाजी विद्यापीठाचे बळ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना बळ देण्यासाठी शिवाजी विद्यापीठाने शैक्षणिक धोरण निश्चित केले आहे. त्याअंतर्गत या विद्यार्थ्यांना शिक्षणासह विविध स्वरुपांतील कौशल्य, प्रशिक्षण देण्यात येणार आहे, अशी माहिती प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी मंगळवारी दिली.

विद्यापीठात ई-बुक्स, ई-जर्नल्स, ऑडिओ बुक्स, ब्रेल प्रिंटिंग, आदी अद्ययावत तंत्रज्ञानावरील साधने असणारे समावेशी शिक्षण संसाधन केंद्र (रिसोर्स सेंटर फॉर इन्क्लुसिव्ह एज्युकेशन) सुरु आहे. राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत (रुसा) हे केंद्र कार्यान्वित आहे. या विद्यार्थ्यांची माहिती, आकडेवारी संकलित केली आहे. त्यांना संगणक हाताळण्यासह अन्य काही कौशल्ये प्राप्त करण्यासाठी आवश्यक असणारे प्रशिक्षण देण्याची व्यवस्था केली जाणार आहे. ग्रंथालयासह ठिकाणी अधिविभाग, प्रशासकीय विभागांमध्ये या विद्यार्थ्यांना जाता यावे; त्यासाठी रॅम्पची सुविधा केली आहे. यामुळे कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यांतील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला बळ मिळणार असल्याचे प्र-कुलगुरु डॉ. शिर्के यांनी सांगितले.